संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पर्यावरणातून मनुष्याच्या अस्तित्वालाच आव्हान

**गेल्या** अनेक वर्षांपासून शाश्वत विकास (सस्टेनेबल डेव्हलपमेंट) हा शब्द वारंवार वापरला जातो आहे. याचा अर्थ विकासाचे अनेक प्रकल्प राबवताना त्याच्या दुष्परिणामांवर नियंत्रण आणण्याचा त्यामागचा हेतू आहे. अर्थात जगभरातील अनेक देशांनी विज्ञान तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अफाट स्वरूपाचा विकास केला त्यामागच्या अर्थकारणातून संबंधित देशांच्या अर्थव्यवस्थाही मजबूत झाल्या. परंतु आता विकासाच्या या अनिर्बंध हव्यासापोटी काही मूलभूत समस्या उभ्या राहिल्या आहेत. यासंदर्भात जर आताच योग्य त्या उपाययोजना केल्या नाहीत. तर पुन्हा पुढच्या शंभर वर्षात एकूणच मानवी जीवनाच्या अस्तित्वाबाबत अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतील. त्यातली सर्वात चिंताजनक बाब म्हणजे संपूर्ण जगातले तापमान सातत्याने वाढते आहे. हवामानातला हा विचित्र बदल केवळ नैसर्गिक स्वरूपाचा नाही. त्यामागे शेकडो अनैसर्गिक कारणे आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनाचा विचारच हद्दपार झाला. निसर्गावर मात करून विकासकामांचा वरवंटा फिरवला गेला. निसर्गाचे संवर्धन करण्याऐवजी त्याच्या शोषणावरच भर दिला गेला. आणि तो अजूनही तसाच सुरू आहे. या सगळ्या विकासकामांसाठी कोणताही मागचापुढचा विचार न करता बेसुमार जंगलतोड केली गेली. शहर आणि नगरांच्या वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्याकरीता सुपीक शेतीसुद्धा नष्ट केली गेली. तिथे उभी राहिलेली अक्राळविक्राळ सिमेंटची जंगले आता वेगवेगळ्या समस्या अक्षरशः हिंस्र स्वरूपातच समोर येत आहेत. प्रामुख्याने वाढत्या तापमानाचे अनेक दुष्परिणाम स्पष्ट झालेले आहेत. ज्यामध्ये नवनवीन रोगांचा प्रादुर्भाव होण्यापासून ते माणसाच्या एकूण कार्यक्षमतेवर परिणाम होण्यापर्यंत हे प्रकार पाहायला मिळत आहेत. म्हणूनच जगभरातील सगळ्या देशांना या बदलत्या हवामानाच्याविरोधात एकत्र येण्याची आवश्यकता वाटली. वाढते तापमान रोखण्यासाठी काय काय उपाययोजना करता येऊ शकतील यासंदर्भात जागतिक स्तरावरच्या हवामान परिषदांमध्ये विचारविनिमय होत असतो. तरीदेखील यामधून सुचवल्या जाणाऱ्या उपाययोजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावणीच होत नाही. किंबहुना ज्या तातडीच्या उपाययोजना आहेत. त्या अंमलात आणण्याबाबत ठोस धोरणही आखले जात नाही.

### हरित घरांचे धोरण

तापमानाचे हे संकट केवळ वातावरणात उष्णता निर्माण करते आहे असे नाही तर यामधून नैसर्गिक साधनसंपत्तीचाही ऱ्हास होतो आहे. म्हणजे ज्या मनुष्याचे जनजीवन प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून असते. त्या निसर्गालाच नख लावले गेल्याने त्या दुष्परिणामांची तीव्रता अधिक वाढलेली आहे. याचे अगदी साधे उदाहरण म्हणजे आतापर्यंत हवामानाचा विचार इतक्या गांभिर्याने झाला नव्हता. परंतु राहाण्यासाठी बांधली जाणारी सिमेंट काँक्रिटची घरं किंवा कार्यालये हीसुद्धा आता तापमानाला आमंत्रण देणारी ठरत आहेत. म्हणजेच काळाच्या गतीप्रमाणे घरांच्या मागणीची पूर्तता तर करावी लागतच असते. मात्र ही घरे पर्यावरणपूरक नसल्याने इतकी महागडी घरंसुद्धा राहाण्यासाठी योग्य ठरू शकत नाहीत. एसी, पंखे याशिवाय घरांमधून राहाणेदेखील मुश्किल झालेले आहे. या समस्येवरचा उपाय म्हणूनच हरित घरांची संकल्पना पुढे आली. जी जगभरात ग्रीन हाऊस म्हणून लोकप्रिय झाली. म्हणजेच अशा टोलेजंग इमारती बांधताना त्यात वापरली जाणारी बांधकाम सामुग्री ही पर्यावरणपूरक ठेवण्याचा प्रयत्न सुरू झाला. इमारतींच्या परिसरात अधिकाधिक निसर्गाचे जतन करण्यावर लक्ष दिले जाऊ लागले. अधिकाधिक नैसर्गिक प्रकाश येईल शिवाय सौर किंवा पवन ऊर्जसारख्या ऊर्जेचा वापर करून इमारतींवर पाणी साठवण्याची व्यवस्था राहील. पावसाळ्याच्या काळातील पाण्याचा पुनर्वापर करण्याच्या व्यवस्था तिथे निर्माण केल्या जातात. ज्याला रेन हार्वेस्टिंग असेही म्हटले जाते. थोडक्यात उष्णता वाढवणाऱ्या साधनांचा किंवा सामुग्रींचा कमीत कमी वापर करून ज्या हरित घरांची निर्मिती अनेक देशांमध्ये होऊ लागली आहे. भारतात मात्र अजूनही त्याचे गांभीर्य सरकार आणि जनतेच्याही लक्षात आलेले दिसत नाही. खरे तर अशा हरित घरांच्या निर्मितीसाठी सर्वाधिक प्रोत्साहन देणारे धोरण सरकारने राबवले पाहिजे. अशा इमारती बांधण्यासाठी विकासकांना सवलती देत असतानाच अशी हरित घरे खरेदी करणाऱ्या सामान्य ग्राहकांना सरकारने वेगवेगळ्या योजनांमधून प्रोत्साहन दिले पाहिजे. आज ज्याप्रमाणे विजेवर चालणारी वाहने खरेदी करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

### सरकारच उदासीन

विकासाची गती कोणीही थांबवू शकणार नाही. पण त्या विकासातून ऱ्हास होणार नाही याची दक्षता निश्चितच घेता येऊ शकते. म्हणूनच त्याला शाश्वत विकास म्हटले गेले आहे. जो प्रामुख्याने मानवी जीवनाच्या सोयीसुविधांबाबत आश्वस्त करतो. पर्यावरणाचा समतोल आधीच बिघडलेला आहे. ज्यांना आपण नैसर्गिक संकटं म्हणतो त्याच्या निर्मितीला आता मानवनिर्मित अनैसर्गिक विकासही कारणीभूत ठरतो आहे. भारतासारख्या विकसनशील देशाने वेळीच जागे झाले पाहिजे. या हरित इमारतींच्या निर्मितीसाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून राबवले जाणारे उपाय हे नगण्य स्वरूपाचेच म्हणावे लागतील. म्हणजे अगदी महाराष्ट्रात सरकारतर्फेच बांधल्या जाणाऱ्या इमारती या पर्यावरणपूरक नाहीत. मुंबईत ठिकठिकाणी उभ्या राहाणाऱ्या म्हाडाच्या इमारती हरित इमारतींसारख्या नाहीत. अनेकठिकाणी बांधली जाणारी सरकारी कार्यालये हीदेखील तशाच तापमानाला पूरक ठरणाऱ्या साधनसामुग्रीतूनच बांधली जात आहेत. पर्यावरणाच्या नावाने जी धोरणं सरकार जाहीर करते परंतु त्याच्याच अंमलबजावणीबाबत सरकारकडूनच प्रचंड अनास्था दाखवली जाते. मग अगदी दिल्लीत उभे राहिलेले प्रचंड असे नवे संसद भवन हे पर्यावरणपूरक किंवा हरित इमारतींच्या अटींची पूर्तता करणारे आहे का अथवा मुंबईतही याच सेंट्रल व्हिस्टाच्या धर्तीवर नवे विधानभवन बांधले जाणार आहे. त्याची आखणी करताना पर्यावरणपूरकतेचा किती गांभिर्याने विचार होणार आहे. या गोष्टी अधिक महत्त्वाच्या ठरतात. म्हणजेच पर्यावरणाची काळजी जर सरकारी पातळीवरूनच प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त झाली तर सामान्य माणसांना त्याचे अनुकरण करणे अधिक सोपे जाऊ शकते.